0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचावे :-**

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, वाशी पोलिस ठाणे, वाशी, नवी मुंबई यांचेकडून दि.३०/०७/२०१२ रोजी प्राप्त अहवाल व त्यासोबत प्राप्त झालेले कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५३/२०१२/जा.५३५, दिनांक ०७/०८/२०१२ व ३१/०८/२०१२.

३) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, वाशी पोलिस ठाणे, वाशी, नवी मुंबई यांचे दिनांक १६/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त लेखी अभिवेदन.

४) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, वाशी पोलिस ठाणे, वाशी, नवी मुंबई यांचे दिनांक २८/०८/२०१२ रोजी प्राप्त लेखी अभिवेदन.

५) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, वाशी पोलिस ठाणे, वाशी, नवी मुंबई यांचे दिनांक १०/०९/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त लेखी अभिवेदन.

६) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, वाशी पोलिस ठाणे, वाशी, नवी मुंबई यांचे दिनांक १२/०९/२०१२ रोजी प्राप्त लेखी अभिवेदन.

७) बोटीचे मालक अकबर लतीफ पिंजारा यांचे दिनांक १२/०९/२०१२ रोजीचे लेखी निवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५३/२०१२/जा. ७८८
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.
दिनांक : ०९ /११ /२०१२.

## आ दे श

**(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)**

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक २२/०७/२०१२ रोजी वाशी पोलिस ठाणे येथील वरिष्ठ पोलिस निरिक्षक सरदेसाई यांना बातमीदारांकडून माहिती मिळाली की, वाशी खाडी पुलाच्या खाली पाण्यात एक बोट उभी असून त्यामध्ये अवैधरित्या ऑईल चोरुन नेत आहेत. अशी माहिती पोलिस उपनिरिक्षक ऋषिकेश संपत पवळ, सपोनि सुगांवकर, पो.ना. उडदे/१५६९, पो.शि. वरगंटे/२२५२, पो.ना. पाटील/२०३५, पो.ना. कदम/११८३, पो.हवा. भोपी/६४५ यांना दिली. त्या अन्वये हजर असलेले पोलिस शिपाई वरगंटे यांनी दोन पंचांना पोलिस ठाणे येथे बोलावून आणून कारवाई करण्याची माहिती पंचांना देण्यात आली.

वरील पोलिस पथक पंचांसह सरकारी व खाजगी गाडीने पनवेल सायन हायवे रोडने जुना वाशी खाडीपुल येथे आले. त्यानंतर जुना खाडीपुलाचे उजव्या बाजूस असलेल्या पायऱ्यांनी खाली उतरले. तेव्हा तेथे हजर असलेल्या मच्छिमारापैकी इसम नामे श्री. विद्याधर सिनवार भोईर यांची बोट खाडी किनारी उभी असल्याने त्यांना वपोनि सरदेसाई यांनी त्यांना मिळालेली बातमी सांगून त्यांची बोट सोबत घेऊन त्यांना मिळालेल्या ऑईलचा साठा असलेल्या बोटीचा शोध घेण्यासाठी येण्याची विनंती केली असता, त्यांनी विनंती मान्य केली. तद्नंतर वरील पथक व पंच विद्याधर भोईर यांच्या बोटीमध्ये बसले व वाशी खाडी पुलाच्या किनाऱ्यापासून उजव्या हाताला सुमारे ३०० मीटर अंतरावर पाण्यामध्ये असलेल्या स्पीड बोटीजवळ सकाळी १०:४५ वाजता पोहचले. तसे वपोनि सरदेसाई यांनी सोबत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांना त्यांच्याकडील हत्यारांसह सतर्क राहण्याचे आदेश दिले आणि जवळ असलेल्या स्पीड बोटीतील इसमांना पथकाने ते पोलिस असल्याचे सांगून त्यांच्या बोटीची तपासणी करावयाची आहे. आपण कोणतीही हालचाल न करता जागेवर थांबून राहण्याचे आदेश दिले. त्याप्रमाणे नमूद बोटीमध्ये हजर असलेले चार इसम काहीएक हालचाल न करता बोटीमध्ये थांबले. पोलिस अधिकारी/कर्मचारी व पंच यांनी दोन्ही बोटीच्या दरम्यान एक बोटीमध्ये असलेली लाकडी फळी टाकून त्यावरुन बातमी मिळालेल्या स्पीड बोटीमध्ये प्रवेश केला. तेथे हजर असलेल्या इसमांना त्यांची नांवे विचारली असता, त्यांनी त्यांची नांवे १) फिरोज अब्दुल खालीक, २) मोहमद शरीफ युसूफ पठाण, ३) नईम मकसुद खान व ४) मल्लेश्वर काशिनाथ सिंग असे असल्याचे सांगितले. तसेच त्यांना सदर बोटीमध्ये काय आहे, याबाबत विचारणा करता त्यांनी बोटीमध्ये ऑईल असल्याचे सांगितले. ऑईल संदर्भात कागदपत्रांची मागणी केली असता, त्यांनी त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारचे कागदपत्र नसल्याचे सांगितले. तसेच सदरचा माल हा मुंबई दारुखाना येथून आणला असून तो माल अकबरभाई नावाच्या इसमाचा आहे, त्यांनी त्यांना सदरचे ऑईल चोरट्या मार्गाने विक्री करा असे सांगितल्याबाबत नमूद इसमांनी पंचासमक्ष सांगितले. पथकाने स्पीडबोटीमध्ये हजर असलेल्या इसमांची अंगझडती घेतली असता, इसम नामे महमद शरीफ पठाण याच्याकडे एक एल.जी. कंपनीचा काळ्या रंगाचा दोन सिमचा मोबाईल फोन, इसम नामे फिरोज खालीद याच्याकडे एक नोकीया कंपनीचा काळ्या रंगाचा मोबाईल फोन व इसम नामे मालेश्वर सिंग याच्याकडे एक एमडि ादा कंपनीचा मोबाईल फोन आढळले.

पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचांसह सदर बोटीची पहाणी करता, ती सुमारे ३५ फुट लांब व १३ फुट रुंद अशी आढळली. सदर बोटीस सफेद व लाल रंग लावलेला असून बोटीच्या दोन्ही बाजूला टायर बांधलेले आढळले. सदरची बोट दोन्ही बाजूस निमुळती असून त्यामध्ये खाली एकूण ६ कप्पे असल्याचे दिसून आले. समोर कप्पा क्र. १ हा असून त्याचे झाकण उघडून पाहता सुमारे ३२ इंच खोलीचा असून तो रिकामा आढळला. सदर कप्प्यामध्ये वेगवेगळ्या साईजचे ऑईल काढण्यासाठी वापरात आणलेले पाईप व ऑईल लागलेले दिसून आले.



ONING & DIR
HEAD OFFI
MUMBAI

त्याचे बाजूला सफेद टाकी दिसून आली. त्याचे पाठीमागे डाव्या हाताला कप्पा क्रमांक २ हा असून त्याचे झाकण उघडून पाहता झाकणाचा आतील आकार सुमारे ३६ इंच X २१ इंचांचा आढळून आला. कप्प्याची खोली ही सुमारे ४८ इंच असून त्यामध्ये हिरव्या रंगासारखे ऑईल भरलेले दिसून आले. त्याचे समोर उजव्या हाताला दोन होंडा जि.के. कंपनीच्या मोटार दिसत असून त्याचे पाठीमागे कप्पा क्रमांक ३ हा असून त्याचे झाकण उघडून पाहता झाकणाचा आतील आकार सुमारे ३६ इंच X २० इंचांचा असून तो रिकामा असल्याचे दिसून आले. त्याची खोली पाहता ती ५५ इंच असून त्याच्या लगतच काळ्या रंगाची important provide full bottom support असे लिहिलेली फायबरची ४० इंच व्यासाची व साडेतीन फुट उंचीची काळ्या रंगाची टाकी असून आतमध्ये थोडे पाणी भरलेले दिसून आले. तसेच २ ड्रम आहेत. पाठीमागील बाजूस केबीन असून त्याचे डावे बाजूस कप्पा क्रमांक ४ हा असून त्याचे झाकण उघडून पाहता झाकणाचा आतील आकार सुमारे २१ इंच X २३ इंचांचा असून त्याची ४८ इंच खोली आढळून आली. त्यामध्ये हिंरव्या रंगाचे ऑईल भरलेले दिसून आले. त्याच्या लगत एक लाकडी कॅबिन तिन्ही बाजूने बंदीस्त असून त्यावर मोकळ्या खिडक्या आहेत, कॅबिन एका बाजूने मोकळी असून त्याची उंची ४३ इंच व लांबी ८ फुट व रुंदी साडे सहा फुट दिसून आली. त्यावर आडगळीचे सामान ठेवलेले दिसून आले. कॅबिनचे आतमध्ये दोन बॅटऱ्या, ११ स्विच व बटन व दोन हाप सॉकेट असून त्याला ३ इंडिकेटर चावी फ्युज व बल्ब लावलेली इलेक्ट्रीक बोर्ड दिसून आली. कॅबिनच्या खाली मशिनरी दिसत असून कॅबिनच्या पाठीमागील बाजूस कप्पा क्रमांक ५ हा असून त्याचे झाकण उघडून पाहता झाकणाचा आतील आकार सुमारे २४ इंच X २२ इंचांचा असून त्यामध्ये हिरव्या रंगाचे ऑईल भरलेले दिसून आले. त्याची खोली ४१ इंच इतकी आहे. कॅबिनचे उजवे हाताला कप्पा क्रमांक ६ हा असून त्याचे झाकण उघडून पाहता झाकणाचा आतील आकार सुमारे २३ इंच X २४ इंचांचा असून त्याची खोली ४८ इंच आहे. तो ऑईलने भरलेला आढळला. कॅबिनच्या पाठीमागच्या टोकाला बावा वल्हीचे पाते व त्या लगत ४ पातीचा पंखा आढळला. कप्पा क्रमांक १ व ३ मध्ये प्लॉस्टिकचे पाईप दिसून आले. तसेच कॅबिनमध्ये एक लॅमिनेशन केलेले नामदेव गोविंद तांडेल याचे नावे असलेले सर्टिफिकेट आढळून आले.

बोटीमध्ये असलेल्या ऑईलची मोजणी करण्यासाठीं हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमीटेड कंपनीचे अधिकारी श्री. राजेश कांबळे यांचेशी भ्रमणध्वनी क्र. ९८६७६७८८४६ वर संपर्क साधून त्यांना घटनेबाबत माहिती देऊन त्यांच्या ताब्यातील इमरजंन्सी वाहन हे सागर विहार वाशी या ठिकाणी पाठविण्यास सांगितले. सदर स्पीड बोटीमध्ये अवैधरित्या ज्वलनशिल ऑईल हे मिळून आल्याने व त्याची मोजदाद करणे सोपे जावे व सुरक्षिततेकरीता स्पीड बोट ही सागर विहार वाशी या ठिकाणी आणण्यात आली. सदर ठिकाणी हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमीटेड कंपनीचे अधिकारी यांचेशी संपर्क साधल्याप्रमाणे त्यांचेकडील इमरजंन्सी वाहन क्र. एमएच-१२-डीजी-७२१३ हे आले. नंतर स्पीड बोटीमध्ये असलेले ऑईलची मोजणी ही कंपनीचे श्री. संपत रामभाऊ गावडे यांनी ते

१४,००० लिटर लुप/गिअर हिरव्या रंगाचे घट्ट ऑईल असल्याचे सांगितले आहे. मिळून आलेल्या ऑईलच्या साठयातून पंचासमक्ष नमुने घेण्यात आले.

अशाप्रकारे दिनांक २२/०७/२०१२ रोजी १०:४५ वाजताचे सुमारास वाशी खाडी पुलाच्या आतमध्ये एका स्पीड बोटीमध्ये ऑईल हे जीवनावश्यक वस्तू पैकी एक असून कंट्रोल ऑर्डर अन्वये ऑईल साठवणूक करणे, विक्री करणे याकरिता आवश्यक परवाना करणे अनिवार्य असतांना इसम नामे १) फिरोज अब्दुल खालीक, २) मोहमद शरीफ युसूफ पठाण, ३) नईम मकसुद खान, ४) मल्लेश्वर काशिनाथ सिंग व त्याचा साथीदार अकबर भाई यांनी संगणमताने सदर कंट्रोल आदेशाचे उल्लघंन करुन ऑईलचा बेकायदेशिररित्या साठा विक्री करिता जवळ बाळगला व त्याची वाहतूक केली. तसेच ज्वालाग्राही पदार्थाची हयगयीने वाहतूक करुन मानवी जिवीतास धोका निर्माण होईल, अशा पध्दतीने कृत्य केल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द १) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३ व ७ तसेच २) भा. द. वि. चे कलम २८५ व ३४ चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द वाशी पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. २७२/२०१२, दिनांक २२/०७/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | एक स्पीड बोट लाल सफेद रंगाची फायबर व लाकडाची | १ नग | ५,००,०००/- |
| २ | लुप/गिअर हिरव्या रंगाचे घट्ट ऑईल | १४,००० लिटर | १४,००,०००/- |
| ३ | दोन होंडा जिके कंपनीचे पंप मोटार्स | २ नग | १२,०००/- |
| ४ | हिरव्या रंगाचा प्लॅस्टिकचा पाईप | १ नग | १,०००/- |
| ५ | एल.जी. कंपनीचा मोबाईल आरोपी नामे मोहम्मद शरीफ पठाण याचेकडून ताब्यात घेतलेला | १ नग | २,०००/- |
| ६ | नोकिया कंपनीचा मोबाईल आरोपी नामे फिरोज खालीक याचेकडून ताब्यात घेतलेला | १ नग | १,०००/- |
| ७ | एक एनझिंडा कंपनीचा मोबाईल आरोपी नामे मल्लेश्वरी याचेकडून ताब्यात घेतलेला | १ नग | १,०००/- |
| | | एकूण | १९,१७,०००/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती वरिष्ठ पोलिस निरिक्षक, वाशी पोलिस ठाणे, नवी मुंबई यांनी वाचावे क्रमांक १ अन्वये केलेली असून, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्रमांक २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून वाशी पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. २७२/२०१२, दिनांक २२/०७/२०१२ मध्ये जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट

CONTROLLER OF RATIONING & DIR... HEAD OFF... MUMBA...

करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक २८/०८/२०१२ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली. 005

दिनांक २८/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस सहाय्यक पोलिस निरीक्षक तथा तपासी पोलिस अधिकारी श्री. एस. बी. साळुंखे यांनी उपस्थित राहुन नमुद गुन्हयातील ६ आरोपींना अटक केल्याचे सांगुन इतर आरोपी फरार असुन अटकेची कारवाई व पुढील तपास सुरु असल्याचे सांगीतले. तसेच जप्त बोटीबाबत संबंधीत प्राधिकरणाकडे मुळ मालकाचे (बोट) नांव मिळण्याबाबत पत्रव्यवहार केला असल्याचे सांगुन वरिष्ठ पोलिस निरीक्षक यांचे वतीने वाचावे क्र. ४ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. सदर सुनावणीस आरोपी/अपचारी यांपैकी कोणीही उपस्थित राहीले नाहीत. सबब, इतर आरोपी/अपचारी यांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक १२/०९/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १२/०९/२०१२ रोजीच्या सुनावणीस सहाय्यक पोलिस निरीक्षक तथा तपासी पोलिस अधिकारी श्री. एस. बी. साळुंखे यांनी उपस्थित राहुन वरिष्ठ पोलिस निरीक्षक यांचे वतीने वाचावे क्र. ६ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. तसेच नमुद गुन्हयात जप्त बोटीचे मालक म्हणुन अकबर लतीफ पिंजारा यांनी उपस्थित राहुन त्यांनी त्यांचे वाचावे क्र. ७ अन्वये लेखी निवेदन सादर केले. सदर सुनावणीसही उर्वरीत आरोपी/अपचारी यांना पुरेशी संधी देवून देखील ते सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत.

सबब, प्रकरण गुणवत्तेच्या आधारे निर्णयास्तव राखून ठेवण्यात आले.

**युक्तीवाद :-**

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, वाशी पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक १६/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात, कारणे दाखवा नोटीस मधील नमुद आरोपींपैकी आरोपी नामे अकबरभाई अद्याप मिळुन आला नसल्याने तसेच स्पीडबोटीचे मालक अद्याप निष्पन्न न झाल्याने त्यांना नोटीसची बजावणी केलेली नाही. उर्वरीत आरोपींना नोटीस बजावण्यात आलेली आहे.

दिनांक २८/०८/२०१२ रोजी प्राप्त अभिवेदनात, नमुद गुन्हयात अटक आरोपी व पाहीजे आरोपी यांनी आपसात संगनमत करुन स्पिड बोटीमध्ये ऑईल हे जीवनावश्यक वस्तु असल्याने साठविणे, वाहतुक करणे, विक्री करणे याकरीता आवश्यक परवाने अनिवार्य असतांना यातील नमुद आरोपीतांनी बेकायदेशिररित्या १४००० लिटर लुप/गिअर हिरव्या रंगाचे घट्ट ज्वलनशिल ऑईल जवळ बाळगुन कंट्रोल आदेशाचे उल्लंघन करुन ज्वलनशिल ऑईलची वहातुक करीत असतांना मिळुन आले म्हणुन गुन्हा दाखल केलेला असुन अधिक तपास चालु आहे. सदर गुन्हयात एकुण ६ आरोपीतांना अटक करण्यात आली असुन, तपासादरम्यान उर्वरीत दोषी आढळून आलेले

आरोपीतांचा सहभाग निष्पन्न झालेले आहेत त्याचा शोध चालु आहे. स्पिड बोटीचे मालक अद्याप निष्पन्न झालेले नाही. सदर गुन्हयात जप्त मुद्देमालाचा उपयोग पुन्हा अशाच प्रकारचे गुन्हे करण्यामध्ये करु नये याकरीता जप्त १४००० लिटर लुप ऑईल व बोट अशी मालमत्ता आरोपींना परत न करता सरकार जमा करण्यात यावी अशी विनंती केली.

दिनांक १२/०९/२०१२ रोजी प्राप्त अभिवेदनात, नमुद गुन्हयातील स्पिड बोटीचे मालक हे लक्ष्मण गोविंद तांडेल असल्याचे प्रादेशिक बंदर अधिकारी, बांद्रा बंदरे समुह, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांचेकडून माहीती मिळाली आहे. परंतु अटक आरोपी नामे अकबर लतीफ पिंजारा याला अटक केली असता त्याने जप्त करण्यात आलेली बोट आपण खरेदी केली असुन त्याबाबतचे दिनांक ०४/०३/२०११ रोजीचे प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. तरी सदर गुन्हयामध्ये हस्तगत केलेला मुद्देमाल आरोपींना परत न करता सरकार जमा करण्यात यावे असे नमुद केले आहे.

दिनांक १२/०९/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित जप्त बोटीचे मालक म्हणुन अकबर लतीफ पिंजारा यांनी युक्तीवाद केला की, त्याने सदरची बोट कफ परेड, मुंबई येथे रहाणारे लक्ष्मण गोविंद तांडेल यांचेकडून मार्च २०११ मध्ये खरेदी केली असुन काही आर्थीक अडचणींमुळे सदरची बोट त्याच्या नांवे हस्तांतरण करुन घेतलेले नाही. सदर बोट त्याने इकरार मोहम्मद अली खान यास मच्छिमाराच्या व्यवसायाकरीता दिनांक ०१/०५/२०१२ ते दिनांक ३०/०४/२०१३ या कालावधीसाठी भाडेतत्वावर दिली असुन सदर करारनाम्यातील अट क्र. ८ अन्वये नियमबाहय व्यवसायाकरीता बोटीचा वापर करु नये असे नमुद असुन त्याची बोट ही वाशी येथे कशी पोहोचली व त्यामधील मिळुन आलेला ऑईलचा साठा कोठून हस्तगत केला याबाबत तो अनभिज्ञ असल्याचे नमुद करुन सदर बोटीवर त्याचे व त्याच्या परिवाराचे उदरनिर्वाह अवलंबुन असल्याने त्यास लवकरात लवकर बोट परत करण्यात यावी अशी विनंती केली.

CONTROLLER RATIONING & DIRE... HEAD OFFICE MUMBAI

**निष्कर्ष :-**

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक २२/०७/२०१२ रोजी वाशी पोलिस ठाणे येथील वरिष्ठ पोलिस निरिक्षक सरदेसाई यांना बातमीदारांकडून माहिती मिळाली की, वाशी खाडी पुलाच्या खाली पाण्यात एक बोट उभी असून त्यामध्ये अवैधरित्या ऑईल चोरुन नेत आहेत. तद्नंतर वरील पोलिस पथक पंचांसह जुना वाशी खाडीपुल येथे आले असता सदर खाडीपुलाच्या उजव्या बाजूस असलेल्या पायऱ्यांनी खाली उतरुन तेथे हजर असलेल्या मच्छिमारापैकी इसम

नामे श्री. विद्याधर सिनवार भोईर यांची बोट खाडी किनारी उभी असल्याने वपोनि सरदेसाई यांनी त्यांना मिळालेली बातमी सांगून त्यांची बोट सोबत घेऊन बोटीचा शोध घेण्यासाठी पथक व पंच विद्याधर भोईर यांच्या बोटीमध्ये बसले व वाशी खांडी पुलाच्या किनाऱ्यापासून उजव्या हाताला सुमारे ३०० मीटर अंतरावर पाण्यामध्ये असलेल्या स्पीड बोटीजवळ पोहचले. स्पीड बोटीतील इसमांना पथकाने ते पोलिस असल्याचे सांगून त्यांच्या बोटीची तपासणी करावयाची आहे. त्याप्रमाणे नमूद बोटीमध्ये हजर असलेले चार इसम काहीएक हालचाल न करता बोटीमध्ये थांबले. पोलिस अधिकारी/कर्मचारी व पंच यांनी स्पीड बोटीमध्ये प्रवेश करुन पहाणी केली असता तेथे हजर असलेले इसम नामे फिरोज अब्दुल खालीक, मोहमद शरीफ युसूफ पठाण, नईम मकसुद खान व मल्लेश्वर काशिनाथ सिंग यांनी बोटीमध्ये ऑईल असल्याचे सांगितले. ऑईल संदर्भात कागदपत्रांची मागणी केली असता, त्यांनी त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारचे कागदपत्र नसल्याचे सांगितले. तसेच सदरचा माल हा मुंबई दारुखाना येथून आणला असून तो माल अकबरभाई नावाच्या इसमाचा आहे, त्यांनी त्यांना सदरचे ऑईल चोरट्या मार्गाने विक्री करा असे सांगितल्याबाबत नमूद इसमांनी पंचांसमक्ष सांगितले. पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचांसह सदर बोटीची पहाणी करता, त्यामध्ये खाली एकूण ६ कप्पे असल्याचे दिसून आले. बोटीमध्ये असलेल्या ऑईलची मोजणी करण्यासाठी सदर ठिकाणी हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमीटेड कंपनीचे अधिकारी यांचेशी संपर्क साधल्याप्रमाणे त्यांचेकडील इमरजंन्सी वाहन क्र. एमएच-१२-डीजी-७२१३ हे आले. नंतर स्पीड बोटीमध्ये असलेले ऑईलची मोजणी ही कंपनीचे श्री. संपत रामभाऊ गावडे यांनी ते १४,००० लिटर लुप/गिअर हिरव्या रंगाचे घट्ट ऑईल असल्याचे सांगितले आहे. मिळून आलेल्या ऑईलच्या साठयातून पंचासमक्ष नमुने घेण्यात आले. व संबंधितांविरुध्द गुन्हा नोंद करुन एकुण रु. १९,१७,०००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

प्रस्तुत गुन्हयातील आरोपीतांना सुनावणीस उपस्थित राहुन त्यांचे लेखी व मौखिक म्हणणे मांडण्यासाठी पुरेशी संधी देवून देखील त्यांच्यापैकी अकबर लतीफ पिंजारा व्यतिरीक्त इतर कोणीही उपस्थित राहीले नाहीत. अथवा सदर सुनावणीच्या प्रक्रियेमध्ये जप्त ऑईलच्या साठयाच्या मालकीबाबतही कोणीही दावा केलेला नाही. यावरुन आरोपी यांना याबाबत काहीही सांगावयाचे नसल्याचे आणि कोणताही खुलासा करावयाचा नसल्याचे तसेच जप्त मुद्देमाल परत मिळण्यासंदर्भात कसलेही स्वारस्य नसल्याचे व नोटीसीतील आरोप मान्य असल्याचे दिसून येते. तथापी, तपासी पोलिस अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात, नमुद गुन्हयात अटक आरोपी व पाहीजे आरोपी यांनी आपसात संगनमत करुन स्पिड बोटीमध्ये ऑईल हे जीवनावश्यक वस्तु असल्याने साठविणे, वाहतुक करणे, विक्री करणे याकरीता आवश्यक परवाने अनिवार्य असतांना यातील नमुद आरोपीतांनी बेकायदेशिररित्या १४००० लिटर लुप/गिअर हिरव्या रंगाचे घट्ट ज्वलनशिल ऑईल जवळ बाळगुन कंट्रोल आदेशाचे

उल्लंघन करुन ज्वलनशिल ऑईलची वहातुक करीत असतांना मिळुन आले म्हणुन गुन्हा दाखल केल्याचे नमुद करुन सदर गुन्हयात जप्त मुद्देमालाचा उपयोग पुन्हा अशाच प्रकारचे गुन्हे करण्यामध्ये करु नये याकरीता जप्त १४००० लिटर लुप ऑईल व बोट अशी मालमत्ता आरोपींना परत न करता सरकार जमा करण्यात यावी असे सांगितले आहे. यावरुन प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या बोट मधील एकुण १४००० लिटर ऑईलचा साठा हा आरोपीतांनी संगनमत करुन गैरमार्गाने व बेकायदेशीररित्या विनापरवाना मिळविल्याचे सिध्द होत असल्याने सदरचा संपूर्ण ऑईलचा साठा अवैध असल्याचे निष्पन्न होत आहे. सबब, नमुद गुन्हयात जप्त करण्यात आलेला ऑईलचा संपूर्ण बेकायदेशिर साठा रासायनिक पृथ:करण अहवालाच्या अधिन राहून शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी, तपासी पोलिस अधिकारी यांनी नमुद गुन्हयातील स्पिड बोटीचे मालक हे लक्ष्मण गोविंद तांडेल असल्याचे प्रादेशिक बंदर अधिकारी, बांद्रा बंदरे समुह, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांचेकडून माहीती मिळाली असल्याचे सांगुन अटक आरोपी नामे अकबर लतीफ पिंजारा याला अटक केली असता त्याने ज़प्त करण्यात आलेली बोट आपण खरेदी केली असुन त्याबाबतचे दिनांक ०४/०३/२०११ रोजीचे प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. सदर गुन्हयात जप्त मुद्देमालाचा उपयोग पुन्हा अशाच प्रकारचे गुन्हे करण्यामध्ये करु नये याकरीता जप्त ऑईल व बोट अशी मालमत्ता आरोपींना परत न करता सरकार जमा करण्यात यावी अशी विनंती केली.

सदर गुन्हा नोंद प्रकरणी पोलिसांनी अकबर लतीफ पिंजारा यास आरोपी म्हणुन अटक केली असुन घटनास्थळी उर्वरीत आरोपीतांनीही बोटीमधील ऑईलचा साठा हा अकबर लतीफ पिंजारा यांचा असल्याचे सांगुन त्यांनी सदरचे गैरकृत्य अकबर यांच्या सांगण्यावरुनच केले असल्याचे कबुल केले आहे. परंतु अकबर लतीफ पिंजारा नामे इसमाने जप्त बोटीचे मालक म्हणुन सुनावणीस उपस्थित राहुन केलेल्या खुलाशात, त्याने सदरची बोट कफ परेड, मुंबई येथे रहाणारे लक्ष्मण गोविंद तांडेल यांचेकडून मार्च २०११ मध्ये खरेदी केली असुन काही आर्थीक अडचणींमुळे सदरची बोट त्याच्या नांवे हस्तांतरण करुन घेतले नसल्याचे सांगुन नमुद बोटीच्या मालकीचा दावा करुन अकबर लतीफ पिंजारा याने बोटीच्या पुराव्यादाखल केवळ प्रतिज्ञापत्राची छायांकित प्रत सादर केली. तथापी, सदरची बोट लक्ष्मण गोविंद तांडेल यांचे नावे असल्याचे प्रादेशिक बंदर अधिकारी, बांद्रा बंदरे समुह, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांच्या नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक बीडीआर-आयव्ही-०१५९४ अन्वये दिसुन येते. तसेच सदर सुनावणीच्या प्रक्रियेमध्ये बोटीचे मुळ मालक यांना सुनावणीस पाचारण करुनही ते सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत. यावरुन बोटीचे अधिकृत मालक लक्ष्मण गोविंद तांडेल यांना सदरची बोट परत मिळण्यास काहीही स्वारस्य नसल्याचे दिसुन येत आहे. जप्त करण्यात आलेल्या स्पिड बोटीचा बेकायदेशीररित्या तस्करीमार्गाने मिळविलेल्या ऑईलची वाहतूक, साठवणूक व अवैध विक्री करण्याकरीता गैरवापर केला असल्याचे सिध्द होत आहे. प्रकरणी, सदर स्पिड बोटीच्या मालकीचा दावा करणारे अकबर लतीफ पिंजारा हे सराईत गुन्हेगार असुन त्यांच्या नावे

नोंदणीकृत नसलेल्या तसेच विनापुरावादर्शक कागदपत्रे असलेली स्पिड बोट त्याच्या बाजारमुल्याएवढी रक्कम भरुन त्यांना परत दिल्यास सदर बोटीचा तस्करी कारवाईमध्ये पुन्हा गैरवापर करण्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच सदरची बोट त्याच्या मालकास परत देण्यास पोलिसांनीही सक्त हरकत घेतलेली आहे. सबब, जप्त करण्यात आलेली स्पिड बोटीची जाहिर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये वाशी पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. २७२/२०१२, दिनांक २२/०७/२०१२ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

<u>आदेश</u> :-

१) जप्त करण्यात आलेल्या स्पिड बोटीमधील संपुर्ण एकूण १४००० लिटर्स ऑईलचा साठा शासनजमा करण्यात यावा.

२) सदर साठ्याची पोलीसांनी सद्याच्या प्रचलित दरानुसार वैध परवानाधारकांस विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

३) जप्त करण्यात आलेली स्पिड बोट शासनजमा करण्यात येत आहे. सदर बोटीची पोलिसांनी जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

४) सदर स्पिड बोटीच्या जाहीर लिलावाच्या प्रक्रियेनंतर पोर्ट ऑफिसर, रजिस्ट्रार/महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड/डेप्युटी डॉक्स मॅनेजर, ओ.एस.सी., मुंबई पोर्ट ट्रस्ट/आयुक्तालय (निवारक) सिमाशुल्क, मुंबई यांना बोटीच्या नोंदणी व इतर प्रक्रियेशी संबंधित असलेल्या विभागास बोटीच्या लिलावाच्या प्रक्रियेबाबत आपल्या स्तरावरुन कळविण्यात येऊन त्याची प्रत या कार्यालयास सादर करावी.

५) घटनास्थळी जप्त करण्यात आलेले दोन होडा जीके कंपनीचे पंप मोटर्स व एक हिरव्या रंगाचा प्लास्टिकचा पाईप शासनजमा करण्यात यावा. सदर वस्तुंची पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

६) घटनास्थळी जप्त करण्यात आलेले एलजी कंपनीचा, नोकिया कंपनीचा व एनझिंडा कंपनीचा प्रत्येकी एक मोबाईल असे एकुण ३ मोबाईल संच कायमस्वरुपी जप्त करुन शासनजमा करण्यात यावा.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) फिरोज अब्दुल खालीक
२) मोहमद शरीफ युसूफ पठाण
३) नईम मकसुद खान
४) मल्लेश्वर काशिनाथ सिंग
५) अकबर भाई
६) इकरार बहीरा
७) फायबर व लाकडी लाल सफेद रंगाच्या स्पीड बोटीचे मालक
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वाशी पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वाशी पोलिस ठाणे, नवी मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोंच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.

३) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.